237

क्र. सी/कार्य-२/जे/३२/डि-८४
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे
कार्यालय, सी.एम.आर.डी.ए. इमारत,
२रा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

दिनांक :- 27 .२.९५

वाचले :- १] शासन, महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. जमीन-२६९०/
प्र.क्र. २६९३/ज-३, दि. २१.२.९१.
२] या कार्यालयाचे सम क्रमांकाचे आदेश दि. २९.५.९१.
३] शासन, महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. जमीन-स २६९०/
प्र.क्र. २६९३/ज-३, दि. २५.१.९५.

ज्ञापन

मौजे-घाटकोपर येथील स.नं. १३६ पैकी या शासकीय जमीनीमधील सुमारे १०० एकर टेकडीवजा जमीनीत झाडे लावून त्यांची जोपासना करण्यासाठी हिरानंदानी कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांना शासन महसूल व वन विभाग ज्ञापन दिनांक २१.२.९१ सोबत त्या अनुषंगाने निर्गमित केलेल्या या कार्यालयाच्या दि. २९.५.९१ च्या आदेशान्वये अनुज्ञप्ती तत्वावर मंजुरी दिली होती. शासनाने आता सदर अनुज्ञप्तीचा कालावधी पुढील १० वर्षाच्या मुदतीकरीता वाढवून देण्याबाबत शासनाने मंजुरी दिली आहे. सोबत प्रश्नांकित जमीनीत रस्ता बांधण्याची ही परवानगी देण्यात आलेली आहे. तरी मे. हिरानंदानी कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या यांना मौजे-घाटकोपर, स.नं. १३६ पैकी या सुमारे १०० एकर शासकीय जमीनीत झाडे लावून त्यांची जोपासना करण्याबाबत १० वर्षाची मुदतवाढ व कच्चा रस्ता बांधण्याची परवानगी खालील अटी/शर्तीवर देण्यात येत आहे.

[१] प्रश्नांकित जमीनीत झाडे लावून त्यांची जोपासना करण्यासाठी अनुज्ञप्ती तत्वावर देण्यात आलेल्या मंजुरीबाबतची मुदतवाढ शासन ज्ञापनाच्या दिनांकापासून म्हणजे दि. २५.१.९५ पासून पुढील १० वर्षासाठी राहिल.

[२] प्रश्नांकित जमीनीत कच्चा रस्ता बांधण्यास देण्यात आलेली परवानगी देखील अनुज्ञप्ती तत्वावर देण्यात आलेली आहे. कच्च्या रस्त्याची लांबी १८४८ मीटर व रुंदी ५ मीटर राहील. हा कच्चा रस्ता कंपनी स्वखर्चाने तयार करील. कंपनी शासनाकडे कोणत्याही खर्चाची भरपाई मागणार नाही.

[३] प्रश्नांकित जमीनीची तसेच त्यांत तयार करण्यांत येणाऱ्या रस्त्याची मालकी शासनाकडे राहिल.

[४] प्रश्नांकित जमीनीचा वर्ड निर्बाध कंपनी यांना मिळणार नाही.

कृ.मा.प.

[५] प्रश्नाधिन जमिनीच्या रस्त्याच्या बांधकामाबाबतीत कोणताही टी.डी.आर कंपनीस मिळणार नाही.

[६] वरील अटी/शर्ती मान्य असल्याबाबत तसेच या कार्यालयाच्या दि. २९.५.९१ च्या आदेशांतील अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र कंपनी यांनी २०.० रुपयांच्या मुद्रांक शुल्काच्या पेपरवर तात्काळ सादर करावे.

[७] वरील अटी/शर्ती तसेच या कार्यालयाच्या दि. २९.५.९१ च्या आदेशांतील अटी/शर्ती यांचा भंग झाल्यास कंपनी यांना कोणतीही नोटीस अथवा आगाऊ सूचना न देता प्रश्नांकित बाबत देण्यांत अनुज्ञप्ती काढून घेण्यांत येईल.

सही/- xxx
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,
संचालक,
मे. हिरानंदानी कन्स्ट्रक्शन प्रा. लि.
१७/ए सरस्वती रोड, सांताक्रूझ(प).
मुंबई-४०००५४.

प्रत :- १] तहसिलदार कुर्ला यांस माहितीसाठी रवाना.
२] नगर भूमापन अधिकारी क्र.[७] यांस माहितीसाठी रवाना.
३] मा. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग यांस माहितीसाठी सादर.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता
3/30/3

एलव्हीएव/३१३९५.

Received Copy
3/4/95

4/4/95
ISSUED

शासन ज्ञापन, क्रमांक-जमीन-२६०५/१६८४/प्र.क्र. २०११/ज-३

महसूल व वन विभाग,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक :- २ जून, २००९

विषय- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा

मौजे घाटकोपर स. नं. १३६ (पै), टेकडीवजा सुमारे ४४ एकर जमीन झाडे लावून त्यांची जोपासणा करण्यासाठी मे. हिरानंदानी कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांना ३० वर्षाच्या मुदतीकरीता अनुज्ञप्ती तत्वावर देणे बाबत..

पहा :- १) शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्रमांक- जमीन-२६९०/प्र.क्र. २६९४/ज-३, दिनांक २१ फेब्रुवारी, १९९१

२) शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्रमांक- जमीन-२६९०/प्र.क्र. २६९४/ज-३, दिनांक २४ जानेवारी, १९९५

शासन ज्ञापन :-

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना त्यांचे पत्र क्रमांक- मशा/जमिन-१/प्र.क्र. १३/२००४, दिनांक १३/१२/२००४ व दिनांक १२/११/२००८ तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक-सी/कार्या-२ डी/३२/ई-८४, दिनांक ५/३/२००४ व दिनांक ५/११/२००५ ला अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्यात येते की, मौजे घाटकोपर, स. नं. १३६ पै टेकडीवजा सुमारे १०० एकर शासकीय जमिनीचे संरक्षण करणे तसेच जमीन झाडे लावून त्यांची जोपासना करण्यासाठी मे. हिरानंदानी कंस्ट्रक्शन्स प्रा. लि. यांना काही विशिष्ट अटींवर जमिनीवरील शासनाची मालकी कायम ठेवून, केवळ झाडे लावण्यासाठी कोणतीही अनुज्ञप्ती फी अथवा भाडे न आकारता अनुज्ञप्ती तत्वावर दिनांक २१/२/१९९१ व दिनांक २४/१/१९९५ च्या ज्ञापनान्वये प्रदान करण्यात आली होती. तथापि सदर अनुज्ञप्तीचा कालावधी दिनांक २५ जानेवारी, २००५ रोजी संपुष्टात आला असून सदरची मुदत ३० वर्षाच्या कालावधीकरीता वाढवून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. मे. हिरानंदानी कंस्ट्रक्शन्स प्रा. लि. यांना उक्त ठिकाणी एकूण १०० एकर जमीन देण्यात आली होती. तथापि विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी त्यांच्या दिनांक १३/१२/२००४ च्या पत्रान्वये व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यांच्या दिनांक ५/३/२००४ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार मे. हिरानंदानी कंस्ट्रक्शन्स प्रा. लि. यांच्या प्रत्यक्ष ताब्यात एकूण ४४ एकर जमीन असल्याने मौजे घाटकोपर, स. नं. १३६ पै टेकडीवजा सुमारे ४४ एकर जमीन झाडे लावून त्यांची जोपासना करण्यासाठी मे. हिरानंदानी कंस्ट्रक्शन्स प्रा. लि. यांना प्रदान केलेल्या जागेच्या अनुज्ञप्तीचा कालावधी शासन ज्ञापन दिनांक २१/२/१९९१ व दिनांक २४/१/१९९५ च्या ज्ञापनामध्ये दिलेल्या अटी/शर्तींवर दिनांक २५ जानेवारी, २००५ पासून पुढे ३० वर्षाच्या कालावधीकरीता वाढवून देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( जे. पी. डांगे )

अपर मुख्य सचिव (महसूल)

महसूल व वन विभाग

6 JUN 2009

1560

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
प्रशासकीय इमारत,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

प्रतिलिपी :-

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, पुणे
३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
४) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई उपनगर जिल्हा.
५) महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) नगर विकास विभाग, नवि-११, मंत्रालय, मुंबई
८) वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
९) विभागीय वन अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई.
१०) ज-३ कार्यासन (नियडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रे. हिरानंदानी कन्स्ट्रक्शन प्रा. लि. पवई, मुंबई ७६

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, ६५५०१११ फॅक्स : ६५५६६८०५ E mail – collrmsd@yahoo.com


277

क्रमांक :-११/कार्या-३डी/एल-६५२
दिनांक :- /६/२००९
25 JUN 2009

**वाचले :** १) शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमीन-२६९०/प्र.क्र. २६९४/ज-३ दि.२१/२/१९९१
२) या कार्यालयाचे आदेश क्र. सी/कार्या-२/२अ/३२/ई-८४ दि.२९/५/१९९१
३) शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमीन-२६९०/प्र.क्र. २६९४/ज-३ दि.२४/१/१९९५
४) या कार्यालयाचे आदेश क्र. सी/कार्या-२/अ/३२/ई-८४ दि.३१/३/१९९५
५) मे. हिरानंदानी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचा अर्ज दि.५/१/२००४
६) या कार्यालयाचे पत्र क्र. सी/कार्या-२डी/३२/ई-८४ दि.५/३/२००४ व दि.५/११/२००५
७) शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमीन-२६०५/१६८४/प्र.क्र. २०११/ज-३ दि.२/६/२००९

**आदेश :**

मौ. घाटकोपर, ता. कुर्ला येथील स.नं. १३६पै. या शासकीय जमीनीमधील टेकडीपैकी सुमारे १०० एकर जागेत झाडे लावून त्याची जोपासना करण्यासाठी मे. हिरानंदानी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना काही विशिष्ट अटींवर जमिनीवरील शासनाची मालकी कायम ठेवून केवळ झाडे लावण्यांसाठी कोणतीही अनुज्ञप्ती फी अथवा भाडे न आकारता अनुज्ञप्ती तत्त्वावर दि.२१/२/१९९१ व दि.२४/१/१९९५ च्या ज्ञापनान्वये प्रदान करणेंत आली होती. तथापि सदर अनुज्ञप्तीचा कालावधील दि.२५/१/२००५ रोजी संपुष्टात आला आहे.

प्रकरणी, उपोदघातातील अ.क्र. ५ कडील मे. हिरानंदानी कं. प्रा.लि. यांनी मुदतवाढीचा अर्ज केल्यानंतर, इकडील कार्यालयाने उपोद्घातातील अ.क्र. ६ नुसार शासनास मुदतवाढीचा प्रस्ताव सादर केला असता, शासनाने उपोद्घातातील अ.क्र. ७ कडील शासन ज्ञापनान्वये मे. हिरानंदानी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्या प्रत्यक्ष ताब्यातील ४४ एकर जमिनीचा अनुज्ञप्तीचा कालावधी दि.२५/१/२००५ पासून पुढे ३० वर्षाच्या कालावधीकरीता वाढवून देण्यांस परवानगी दिली आहे.

सबब, उपरोक्त शासन ज्ञापनान्वय दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने मे. हिरानंदानी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या मौ. घाटकोपर ता. कुर्ला येथील स.नं. १३६पै. टेकडीवजा सुमारे ४४ एकर जमीनीची दि.२५/१/२००५ रोजी संपुष्टात आलेला अनुज्ञप्तीचा कालावधी पुढील ३० वर्षारीता खालील अटी/शर्तीवर वाढवून देणेंत येत आहे.

अटी /शर्ती:

१) या कार्यालयाचे आदेश दि.२९/५/१९९१ व दि.३१/३/१९९५ मधील सर्व अटी/शर्ती अनुज्ञप्ती धारकावर बंधनकारक राहतील.

२) प्रश्नांकित जागेत झाडे लावून त्याची जोपासना करण्यांसाठी अनुज्ञप्ती तत्त्वावर देण्यांत आलेल्या मंजुरीबाबतची मुदतवाढ दि.२५/१/२००५ पासून पुढील ३० वर्षासाठी राहील.

३) प्रश्नांकीत जमीनीची तसेच, त्यात तयार करणेंत आलेल्या रस्त्याची मालकी शासनाकडेच राहील.

४) प्रश्नांकित जमिनीचा चटई क्षेत्र निर्देशांक कंपनीस वापरता येणार नाही.

५) वरील अटी/शर्ती तसेच या कार्यालयाच्या दि.२९/५/१९९१ व दि.३०/३/१९९५ चे आदेशातील अटी/शर्तींचा भंग झाल्यास कंपनीस कुठलीही नुकसान भरपाई न देता जमीन शासनजमा करणेंत येईल.

६) वरील अटी शर्ती मान्य असल्याचे बंधपत्र रक्कम रु. २२०/- च्या मुद्रांकित पेपरवर टाईप करुन या कार्यालयास सात दिवसात सादर करावे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी
यांची सही आहे.

प्रति,
मे. हिरानंदानी कस्ट्रक्शन प्रा.लि.,
ऑलंपिया, सेन्ट्रल अॅव्हेन्यु,
हिरानंदानी बिझीनेस पार्क,
पवई, मुंबई - ४०० ०७६

प्रत :- १) मा. अपर मुख्य सचिव(महसूल), महसूल व वन विभाग यांचेकडे त्यांचेकडील ज्ञापन दि.२/६/२००५ चे अनुषंगाने माहितीकरीता सविनय सादर.
२) मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचेकडे माहिती करीता सविनय सादर.
३) तहसिलदार, कुर्ला यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.
४) नगर भूमापन अधिकारी, घाटकोपर यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी
यांची सही आहे.

ISSUED